प्रेस नोट, दिनांक :- २६/०२/२०१९

## स्वारगेट पो.स्टे. परिसरात दहशत पसरविणा-या अट्टल गुन्हेगारावर एम.पी.डी.ए. कायदयान्वये स्थानबध्दतेची कारवाई

स्वारगेट पो. स्टे. हद्दीत राहणारा गुन्हेगार इसम गोविंदसिंग पापुलसिंग टाक, वय २० वर्षे रा. ४२९/३०, डायस प्लॉट, गुलटेकडी, पुणे हा अभिलेखावरील सराईत गुन्हे करणारा गुंड गुन्हेगार आहे. त्याने त्याचे साथीदारांसह स्वारगेट पोलीस ठाणे हद्दीमध्ये कोयता, चाकू यासारखी जीवघेणी हत्यारे दरोडा, दुखापत, दंगा, जबरी चोरी, महिलांची छेडछाड करणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. त्याची गुन्हेगारी कृत्ये सन २०१७ पासून चालू आहेत. त्याचेविरूध्द ०६ गुन्हे दाखल आहेत. त्याचेविरूध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात येवून सुध्दा त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर काहीएक परिणाम होत नसलेचे दिसून आले होते. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परीसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जिवीताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

श्री. शिवाजी बोडके, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. अशोक कदम, नेमणूक स्वारगेट पो. स्टे. यांनी एमपीडीए कायदयान्वये नमुद इसमास स्थानबध्द करण्याकामी प्रस्ताव तयार करुन मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेकडे सादर केला होता. श्री वेंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी प्रस्तावाची पडताळणी करुन नमुद इसमाचेविरुध्द दिनांक २२/०२/२०१९ रोजी एमपीडीए कायदयान्वये एक वर्षाकरीता स्थानबध्दचे आदेश पारीत केले आहेत. त्यानुसार त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे स्थानबध्द करुन ठेवण्यात येत आहे.

श्री वेंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सक्रीय व दहशत निर्माण करणा-या अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबले असून **सदरचे धोरण पुढे चालू ठेवून वर नमुद इसमाविरुध्द एमपीडीए कारवाई केली आहे.** वर नमुद गुन्हेगारांवर स्थानबध्द कार्यवाही वेळेत करणेकामी श्री. बच्चन सिंग, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२, पुणे, वपोनि श्री अशोक कदम, श्री. मच्छिंद्र पंडित (गुन्हे), पोलीस नाईक २८४२ हर्षल दुडम, पोलीस शिपाई ९९०७ भूषण उंडे सर्व नेमणूक स्वारगेट पोलीस ठाणे यांनी चांगली कामगिरी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
स्वारगेट पोलीस ठाणे पुणे शहर